असा. क्र. ६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, फेब्रुवारी ३, २००३/माघ १४, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | ३०-३३ |


**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ फेब्रुवारी २००३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. I OF 2003.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.

**सन २००३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १.**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९५८ चा मुंबई ६०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताचे संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

**१.** (१) या अध्यादेशास, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २००३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १० ची सुधारणा.

२. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा " मुख्य अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १० मध्ये,— १९५८ चा मुंबई ६०.

(क) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२-१अ) मुंबई मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २००३ अंमलात आल्याच्या दिनांकापासून उमटमुद्रांकावरील लावलेल्या संलेखांच्या बाबतीत, अशा मुद्रांकावर राज्यातील कोषागार, उप कोषागार किंवा मुख्य मुद्रांक कार्यालय याच्या प्राधिकृत अधिकाऱ्याचा किंवा राज्यातील मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी मुद्रांक अधीक्षक किंवा मुद्रांक समाहारक याने नियुक्त केलेल्या योग्य अधिकाऱ्याचा शिक्का व तारखेसह सही असेल : २००३ चा महा. अध्या.१.

परंतु, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट दिनांकापासून अशी आवश्यकता काढून टाकता येईल. " ;

(ख) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यांस **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असे विनिर्दिष्ट करता येईल की, अनुसूची एक मध्ये अंतर्भूत असलेल्या संलेखांच्या संदर्भातले उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, आकारणीपात्र असलेले शुल्क :—

(१) फ्रँकिंग मशीनद्वारे ;

(२) रोखीने ;

(३) दर्शनी धनाकर्षाद्वारे ; किंवा

(४) प्रदानादेशाद्वारे ,

कोणत्याही शासकीय कोषागारात, उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालयात भरता येईल आणि मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने या प्रयोजनाकरिता, यथोचितरित्या निर्दिष्ट केलेल्या समुचित अधिकाऱ्याने संलेख्यांवर केलेल्या तशा आशयाच्या पृष्ठांकनाद्वारे अशा शुल्काचे प्रदान केल्याचे दर्शविता येईल. ".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० यात कलम १० अ समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

शासनाच्या नियंत्रणाखालील निकाय, विमा कंपन्या आणि बँकानी रोखीने, दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने शुल्काचा भरणा करणे.

" **१० अ.** कलम १० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य किंवा केंद्र शासन यांची मालकी किंवा नियंत्रण असलेल्या निकाय, विमा कंपन्या आणि राष्ट्रीयकृत बँका यांच्या प्रकरणात, असे निदेश देता येतील की ते शुल्क, त्यांचे मुख्य कार्यालय किंवा प्रादेशिक कार्यालय किंवा क्षेत्र कार्यालय यांनी, कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे रोख, किंवा दर्शनी धनाकर्षाने किंवा प्रदानादेशाने भरता येईल आणि मुख्य नियंत्रक

महसूल प्राधिकाऱ्याने तसे अधिसूचित केलेला शाखा व्यवस्थापकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला योग्य अधिकारी, शुल्काच्या संलेख्यांवर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करील,—

" पावती / चलान क्र. .................................... दिनांक .................................... अन्वये रुपये .................................... एवढे शुल्क रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे भरण्यात आले. ".

योग्य अधिकाऱ्याची सही. ".